महाराष्ट्र कष्टकरी आंदोलन समिति
द्वारा-श्री.राम देशपांडे
गांधी सेवा मंदिर, स्वामी विवेकानंद
रस्ता,वांद्रा (पश्चिम) मुंबई ४०० ०५०

दिनांक १ मार्च १९८७

प्रती

श्री. ------ लटवार ------

नमस्कार,

महाराष्ट्राच्या ग्रामीण भागात अनेक संघटना, संस्था व व्यक्ती विविध राजकीय प्रणाली, सामाजिक जाणीवांनी प्रेरित होऊन परिवर्तनासाठी गेली अनेक वर्षे काम करीत असून श्रमिक जनतेच्या समस्या सोडावण्याचा प्रयत्न करीत आहेत.

समस्यांची उकल करण्यासाठी प्रचलित राजकीय व्यवस्थेवर, शासन संस्थेवर संघटीत जागृत श्रमिक जनतेचा दबाब आणण्यास आपण अनेकवेळा अपुरे पडल्याने श्रमिकांचे प्रश्न सोडविण्यांत अयशस्वी ठरतो. धड ना समस्यांची सोडवणूक होते, ना धड श्रमिकांची ताकद वाढते.

स्वातंत्र्य मिळाल्यानंतर आर्थिक, सामाजिक बदलासाठी आवश्यक वाटणाऱ्या सुधारणा करण्यासाठी अनेक कायदे केले गेले. (हे कायदे सर्वस्वी आदर्श नसतील, किंबहुना त्यात काही त्रुटीही असतील ) परंतु एका बाजूस हितसंबंधी वर्गाचा विरोध, राज्यकर्त्यांच्या राजकीय इच्छाशक्तीचा अभाव, नोकरशाहीचे असहकार्य व भ्रष्टाचार तर दुसऱ्या बाजूला श्रमिकांच्या संघटनांची दुर्बलता, अपुरेपणा यामुळे त्या कायद्यांच्या अंमलबजावणीद्वारा जो बदल अपेक्षित होता तो बदलही होऊ शकला नाही.

महाराष्ट्रात अनेक ठिकाणी सघन क्षेत्रात काम करणाऱ्या जनसंघटना आहेत. असे असले तरीही, व्यापक प्रश्नावर जनमताचा दबाव निर्माण करण्यात त्या अपूऱ्या पडतात असा अनुभव आहे. अनेक संघटनांनी हाती घेतलेल्या समान प्रश्नांवर फुटकळपणे लढल्याने प्रचंड ताकद खर्च होऊनही परिणामाच्या दृष्टीने त्या प्रभावी ठरत नाहीत.

संघटनांनी एकत्र यायचे ठरले तर राजकीय विचारांचा संघर्ष,व्यक्तीचा अहंकार, इतरांबरोबर गेलो तर आपले शुध्दत्व नष्ट होईल ही भिती, एकदुसऱ्या बरोबरचा अविश्वास यामुळे एकत्र यायचे टाळतो व आलो तरी पुन्हा दुभंगतो.

या एकत्र येण्यामागे सर्वांना एका संघटनेत किंवा पक्षात गोवण्याचे अंतस्थ हेतु असतील, तर मात्र हळूहळू अविश्वासाने एकमेकांपासून दूरच जावेसे वाटते किंवा जातोहि.

आपआपली राजकीय विचारप्रणाली, कार्यपध्दती यांचे स्वातंत्र्य राखून, एक दुसऱ्यांच्या हेतु विषयी शंका न घेता, खुल्यादिलाने एकत्र येण्याचे महाराष्ट्र कष्टकरी आंदोलन समितीच्या घटक संघटनांनी ठरवले व एकत्र येऊन भूमिमुक्ती सत्याग्रहाने जमीन-प्रश्नांच्या लढ्याचे शिंग फुंकले आहे

अजूनही समितीत सामील न झालेल्या संघटना, संस्था, व्यक्तींना बरोबर घेऊन जाणे समितीला आवश्यक वाटते. त्यासाठी असे आपल्याबरोबर येऊ

इच्छिणाऱ्यांना एकत्र घेऊन आपली व्यापक भूमिका निश्चित करण्याचे समितीने ठरविले आहे.

त्यादृष्टीने महाराष्ट्र कष्टकरी आंदोलन समितीने अशा संघटना, संस्था व व्यक्तींचे दोन दिवसांचे संघटनविषयक शिबीर घेण्याचे निश्चित केले आहे.

आपणास एकत्र येण्याच्या ह्या प्रक्रियेत काय भूमिका असावी ह्याविषयीचे आपले टीपण पाठवायचे असल्यास ८ एप्रिल १९८७ पर्यन्त पाठवावे.

महाराष्ट्र कष्टकरी आंदोलन समितीचा जमिनीविषयक भूमिकेचा पूर्ण चर्चेसाठी खुला असलेला मसुदा, ~~बेघरांना निवारा व. संबंधातील टीपणे~~ आपणांस (पाठविला) आहे. ह्या टीपणांवर ह्या शिबीरात चर्चा अपेक्षित आहे.

तरी आपण सदर शिबीरास उपस्थित रहावे ही विनंती.

शनिवार दि. १८ एप्रिल १९८७ रोजी सकाळी १० वाजता शिबीर सुरु होऊन रविवार दि. १९ एप्रिल १९८७ रोजी संध्याकाळी ५ वा. संपेल.

ठिकाण : हमालभवन, गुलटेकडी, मार्केट यार्ड, पुणे

भोजन । निवासाची व्यवस्था समितीतर्फे केली जाईल. आपण आवश्यक अंथरुण । पांघरुण सोबत आणावे.

आपण येत असल्याचे कळवावे.

कळावे.

आपले,

राम देशपांडे नागेश हाटकर

निमंत्रक, महाराष्ट्र कष्टकरी आंदोलन समिती




बुक पोस्ट

द्वारा-
महाराष्ट्र कष्टकरी आंदोलन समिती
द्वारा- श्री.राम देशपांडे
गांधी सेवा मंदिर, स्वामी विवेकानंद रस्ता, वांद्रा (प.) मुंबई ४११ ०५०

प्रती
श्रीमान सरदार
मुकुंद, ९२४३ शिवाजीनगर
ओपेर रोड पुणे ४११००४